International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# आदिवासी साहित्याच्या प्रेरणा

**अनिल गोवर्धन पवळ**

संशोधकविद्यार्थी, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र – ४११००७.

**Abstract:**
While thinking about tribal literature inspiration, form, you have to understand tribal religion culture briefly. Adivasi man is a nature worshipper, so his 'religion' is nature as seen in the discussion of tribal scholars.

**Keywords:** Trible, Literature, Marathi

**प्रस्तावना**

आदिवासी साहित्य प्रेरणा, स्वरूप या विषयीविचार करतांना आपणास आदिवासी धर्म संस्कृती थोडक्यात समजून घ्यावी लागते. आदिवासी माणूस हा निसर्गपूजक आहे, त्यामुळे त्याचा 'धर्म' हा निसर्ग असल्याचे आदिवासी अभ्यासकांच्या चर्चेतून दिसून येते. आदिवासी कवी तुकाराम धांडे यांनी आदिवासी माणसाच्या धर्माविषयी म्हटले आहे की, "भारतातीलच नव्हे, तर जगाच्या पाठीवर ज्या आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत, त्यांना कधीही धर्माची आवश्यकता भासली नाही. तरीसुद्धा त्या निसर्गनियमानुसार कितीतरी आनंदाने आणि समाधानाने जीवन व्यतीत करतात. भलेही त्या भौतिक सुखापासून वंचित असतील. परंतु भौतिक सुखाचाच विचार केला तर सध्या कोणताही धर्म अस्तित्वात नाही. असेच म्हणावे लागेल."[१] वरील आशयातून धांडे यांनी येथील प्रस्थापित धर्माची चिकित्सक पद्धतीने तुलना करून आदिवासी धर्म स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी सामाजिक कार्यकर्ते कवी 'वाहरू सोनवणे यांनी आदिवासी धर्म व एकूण मानवी धर्माविषयी म्हटले आहे की "माणसानं माणसासारखं वागण, माणुसकी जपण, जीवन सृष्टीला प्रतिष्ठेने जगवणं अशा त-हेच्या जीवन पद्धतीलाच धर्म म्हणेन."[२] अशाप्रकारे वरील दोन्ही अभ्यासकांनी आजच्या धर्माची चिकित्सक पद्धतीने तुलना करून अदिम धर्माची मानवतेची अपेक्षा धर्माकडून केल्याचे दिसून येते.

**आदिवासी धर्म**

आदिवासींचा धर्म कोणता, ही अनेक वाचकांच्या मनातील असलेली शंका दूर करण्यासाठी ही मांडणी करणे गरजेचे वाटले. 'तुकाराम रोंगटे' म्हणतात, "आदिवासी कुणाला म्हणायचे? तर नाचसंस्कृतीत पुढारलेला, मात्र वाचनसंस्कृतीत मागासलेला समाज म्हणजे आदिवासी होय."[३] एकूणच आदिवासी धर्म, संस्कृती यांच्याविषयी अभ्यासकांची मते विचारात घेतल्यास निसर्ग, मानवता ही मूल्य केंद्रस्थानी आल्याचे दिसून येते. १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भद्रावती, जि. चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या, पहिल्या आदिवासी संमेलनाने साहित्यक्षेत्रात एक नवे वैचारिक आंदोलन उभे ठाकले. मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह म्हणून का होईना, मान्यता देऊन विद्यापीठ अभ्यासक्रमात आदिवासी साहित्याचा समावेश केला आहे.

**आदिवासी साहित्य चळवळ :**

आदिवासी साहित्य हे कोणत्याही इतर साहित्याची प्रतिकृती नाही. याविषयी विनायक तुमराम म्हणतात की, “भूतकाळातील स्थिती-गतीचा तपशील सोबत घेऊन व वर्तमानाचे भान ठेवून आदिम जीवन संस्कृतीशी प्रश्न-समस्यांशी वेदना विद्रोहाशी, भावभावनाशी व आशा-आकांक्षाशी निगडित. जे जे काही लिहिले जाईल ते सर्व आदिवासी साहित्य ठरेल. "[४] आदिवासी साहित्य चळवळ सुरू झाली आणि मराठी साहित्यात नवीन अनुभवविश्वाची भर पडू लागली. पूर्वीचे असणारे नागरी साहित्य, पांढरपेशाच्या चौकटी आदिवासी साहित्याने तोडल्या. त्यामुळे मराठी वाङ्मयीन दालनात नवीन बोलीची, शब्द, वाक्प्रचार, म्हणी, भावभावना, आशय-विषयाने निराळेपण मांडणारी कथा, कविता मराठीमध्ये येऊ लागली. 'आदिवासी साहित्याचा' प्रश्न निघाला की ज्येष्ठ मंडळी सरळ आदिवासींच्या लोककथा आणि लोकगीते यांच्याकडे बोट दाखवून मोकळी होतात. त्यामुळेच अशा लोकांना जागे करण्याचे ठणकावून सांगण्याचे काम आदिवासी साहित्यप्रवाहाने केल्याचे दिसून येते. बिगर आदिवासी साहित्यिकांनी आदिवासी जीवन फक्त आपल्या कथा, कादंबरी, कवितेमधून चाखण्यापुरतेच घेतले होते. मात्र आदिवासी आणि भटक्या जमातीचे लेखक जेव्हा 'आपुली आपण करा सोडवण' या हिमतीने स्वतः लेखणी उचलतात तेव्हा साहित्यात काही नवे अवतीर्ण होत असल्याची चाहूल येते. वाहरू सोनवणे, विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, तुकाराम धांडे, भुजंग मेश्राम, कुसुम आलाम, आत्माराम राठोड यांसारखे कवी जेव्हा आपल्या जीवनवास्तवाला साक्षी ठेवून लिहू लागतात, तेव्हा त्यांचे पृथक अनुभवविश्व त्यांच्या मराठी भाषेची विशिष्ट अशी मांडणी, अभिव्यक्तीच्या आगळ्या लकबी हे अगदी स्वभाविकपणे त्यांच्या लेखनात अवतरू लागते. प्रेमाची धीट अनुभव, व्यवस्थेबद्दलची तीव्र ठणक, दारिद्र्याच्या जखमा, परवशतेचा संताप आणि धुमसता हताशपणा हे सारे अगदी सहज बोलीभाषेच्या डौलासह व

तितक्याच साधेपणासह साकार होऊ लागते. आदिवासी कवींनी येथील प्रस्थापित व्यवस्थेला आदिवासी माणसाच्या दुःखाची, दारिद्र्याची, विस्थापनाची माहिती करून देण्याचे, जागे करण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. 'धरण आणि आदिवासीचे मरण' यासारखी कविता आदिवासी विस्थापनाचा प्रश्न उपस्थित करते. कुपोषणासारखी कविता आदिवासींच्या गरिबीचे चित्रण करते 'गोधड' सारखा कवितासंग्रह आदिवासी माणूस आणि त्याची संस्कृती, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार यांच्या विरुद्ध आवाज उठवताना दिसून येतो. 'वळीव' सारखा कवितासंग्रह निसर्गधर्माची शिकवण देताना जागतिकीकरणाचे परिणाम मांडतो आहे. लेखणीच्या तलवारीसारख्या कवितासंग्रहातून 'स्त्री' दुःख, दारिद्र्य, अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठवतो आहे; त्यामुळे आदिवासी साहित्य प्रवाहाने मराठी वाङ्मयात नवीन अनुभवविश्वाची भर घातली आहे. आदिवासी साहित्याने नवीन जीवन मूल्याची रुजवण मराठी साहित्यात करण्याचे काम केले आहे. आदिवासी कवींनी येथील प्रस्थापित समाजाला आदिवासी संस्कृतीची ओळख करून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यामुळे प्रकाश देशपांडे आदिवासी संस्कृतीविषयी म्हणतात की, "मुळात आदिवासी संस्कृती स्वयंभू आहे. तिला तिचा वेगळा देव-धर्म, रूढी- परंपरा, स्वतःची वेगळी समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था आहे. तिला स्वत:ची नैतिक मूल्य आहेत. "[५] देशपांडे यांनी आदिवासी साहित्य वाचनातून आलेला हा अनुभव मांडला असावा. आदिवासी कवितेबरोबरच आदिवासी कादंबरीने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. 'तृष्णा' ही नजुबाई गावीत यांची कादंबरी आदिवासी भिल्लोरी जीवन मांडणारी आहे. माधव सुरकुंडे यांची 'वाडा' ही कादंबरी 'अंध' जमातीवरील शोषण आपल्या बोलीतून मांडणारी आहे. 'टाहो' ही बाबाराव मडावी यांनी आदिवासी वेठबिगारी आणि त्या विरुद्ध संघर्ष मांडणारी आहे. एकूणच आदिवासी कादंबरीने वेगवेगळ्या आदिवासी जमातींचे जीवन, रूढी, प्रथा, चालीरीती आणि अन्याय-अत्याचार यांची ओळख प्रस्थापित व्यवस्थेला करून दिली आहे.

**आदिवासी आत्मकथने :**

याचबरोबर आदिवासी आत्मकथेने आदिवासी समाजाचे सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे वास्तव चित्रण केले आहे. नजूबाई गावित यांचे 'आदोर' हे आत्मकथन तीन पिढ्यांचे चित्रण करणारे आहे. बाबाराव मडावी यांचे 'आकांत' हे आत्मकथन परधान जमातीचे, सामाजिक, राजकीय, आर्थिक कौटुंबिक वास्तव चित्रण करणारे आहे. 'ठिगळ' हे नाशिक जिल्ह्यातील कोळी महादेव जमातीमधील किसन डगळे यांचे आत्मकथन आहे. 'चोरटा' हे संतोष पवार यांचे 'पारधी' जमातीचे वास्तव जीवन चित्रण रेखाटणारे आहे. याचबरोबर आदिवासी साहित्यात कथालेखनही केल्याचे दिसून येते. 'अहेर' उषाकिरण आत्राम, 'सर्वा' माधव सुरकुंडे, 'भाकर' बाबाराव मडावी, 'ताडम', 'अस्वस्थ मी', 'आक्रोश' अशाप्रकारच्या आदिवासी कादंबरी, आत्मकथन, कथा, कविता यांनी आदिवासी बोली, आदिवासी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाची ओळख प्रस्थापित समाजाला करून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. कथेंप्रमाणेच आदिवासी लेखकांनी नाट्यलेखन व एकांकिका लेखनही केले आहे. कुंडलिक केदारी हे आदिवासी नाटककार म्हणून अलीकडे चर्चेत येऊ लागले आहेत. त्यांचे 'अली रंगात राणी' (१९९९) 'आक्रोश' २००३ आणि 'कथा इंद्रपुरीची' २००५ ही तीन नाटके त्यांच्या नावावर आहेत. 'आली रंगात राणी' हे वगनाट्य असून त्याचे अनेक प्रयोग झाले आहेत. आदिवासी नाटकांबरोबरच आदिवासी एकांकिका लेखन चांगल्या प्रकारे झाल्याचे दिसून येते. आदिवासी नाट्यलेखन जरी प्रकाशित झाले नसले, तरी काही एकांकिका मात्र स्फुट रूपात प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांत भुजग मेश्राम यांच्या 'औतान', 'सवारी', 'मातामाय' आणि 'सोंग' या एकांकिका उल्लेखनीय आहेत. दुसरे एकांकिका लेखक म्हणजे कुंडलिक केदारी 'भागोजी नाईक', 'छळ', 'विरह' आणि शापित या त्यांच्या एकांकिका हे दोन्ही नाटककार गोंड आणि महादेव कोळी या आदिवासी जमातींमधून पुढे आले आहेत. 'देज' ही रायसिंग महाराज यांची एकांकिका होय. आदिवासी एकांकिका ह्या मोठ्या प्रमाणात 'हाकारा' या त्रैमासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'देज' ही एकांकिका भिल्ल समाजात परंपरेने चालत आलेली 'देज' प्रथा आहे. 'विरह' या एकांकिकामधून पतिविरहात जळणारी स्त्री कोणत्या थराला जाऊ शकते, हे यात दाखविले आहे. अशा प्रकारच्या सामाजिक विषय घेऊन आदिवासी समाजातील प्रथा, परंपरा, रूढीची ओळख करून देण्याचे काम आदिवासी नाटक आणि एकांकिकांमधून आदिवासी लेखकांनी केले आहे. आदिवासी वीर क्रांतिकारक यांच्या विषयी एकांकिका लेखन करून त्यांची माहिती करून देण्याचे काम आदिवास एकांकिका करत आहेत. भुंजग मेश्राम आदिवासी लेखकांविषयी म्हणतात की, "आमच्या बऱ्याच आदिवासी लेखकांचा आत्ता कुठे सुसंवाद सुरू झालेला आहे. आमची आज पन्नास ते शंभर पुस्तक तयार आहे. आमची स्क्रीप्ट तयार आहे. परंतु आमच्या साहित्यक्षेत्रात साहित्य संस्कृती मंडळाची आणि अनुदान संस्कृतीची जी बोलवा आहे, त्यामुळे अजूनही आजचे लेखन त्या अनुदानाच्या प्रतिक्षेत असावेत असं दिसतंय."[६] मेश्राम यांचे म्हणणे जरी सत्य असले तरी आदिवासी साहित्य आजच्या घडीला आपले पाय भक्कम करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मराठी साहित्यात अजून खूप नवीन अनुभवविश्वाची, नव्या जगाची भर पडणार आहे.

आदिवासी साहित्याच्या भवितव्यासंबंधी विनायक तुमराम म्हणतात की, "आदिवासी साहित्य ही आदिवासींनी चोखाळलेली आज एक नुसती रानवाट आहे, जी रानातून निघून भविष्यात एका उत्थानाच्या महामार्गाला जाऊन मिळणार आहे. जंगलजिव्हाऱ्यातील गिरीकुहरातील आदिवासी समूह हाकारत या शतकात आज दाखल झाले आहेत. आपल्या अस्तित्व-अस्मितेच्या रक्षणार्थ हे समूह आता सज्ज झाले आहेत. स्वतःचे हित जपतानाच 'बहुजनकल्याणी' अशी त्यांची युगवाणी असणार आहे. धर्म, संस्कृती भाषा, इतिहास, शिक्षण, तसेच सामाजिक-राजकीय चिंतन या सर्व वळणांना स्पर्श करीत आदिवासी साहित्यधारा पुढे जात आहे. "" अशाप्रकारे आदिवासी समीक्षक यांचे आदिवासी साहित्याविषयी मत लक्षात घेतल्यानंतर आदिवासी साहित्याचे, साहित्यविषयक योगदान लक्षात येते.

**समारोप**

आदिवासी साहित्याने मराठी वाङ्मयात भाषिक दृष्टीने मोलाची भर टाकलेली आहे. नव्या जगाची नवीन अनुभवविश्वाची भर घातली गेली आहे. अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला आहे. आदिवासी कला, संस्कृती, निसर्ग यांची ओळख येथील प्रस्थापित समाजाला करून दिली आहे. त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध

होण्यास नक्कीच मदत झाली आहे.

**संदर्भ आणि टिपा :**

1. धांडे तुकाराम, 'आदिवासींच्या धार्मिक अस्मितेचा उदय' (संपा.). संजय लोहकरे, यशोदीप क्रिएशन्स, पुणे, प्रथमावृत्ती ३० ऑक्टो २०११, पृ.११.
2. सोनवणे वाहरू, (तत्रैव, पृ.१३).
3. रोंगटे तुकाराम, 'आदिवासी कवितेतून जागतिकीरणाचे चित्रण 'हाकारा', ऑक्टो-डिसें २०१४, पृ.१५.
4. तुमराम विनायक, 'पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाचा (पालघर) वृत्तांत', 'हाकारा', जानेवारी-जून १९९१, पृ.२५.
5. देशपांडे प्रकाश, 'समकालीन मराठी कविता : एक निरीक्षण', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती

a. डिसें. २०१३, पृ.६५.

6. मेश्राम भुजंग, 'हाकारा' जानेवारी-मार्च २००२, पृ.३६.